# राष्ट्रीय कुटुंब लाभ

सदरची केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना दिनांक १५ ऑगस्ट,१९९५ रोजी लागु करण्यात आली असून कुटुंबाच्या एकुण उत्पन्नात ज्याचा उत्पन्नाचा वाटा मोठा असेल, अशा प्रमुख कमावत्या स्त्री / पुरुषाचा मृत्यू झाल्यास त्या कुटुंबाला या योजनेचा लाभ देण्यात येतो.

# राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना

सदर योजनेत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील १८ ते ५९ वयोगटातील कोणत्याही कमावत्या व्यक्तीचा मृत्यु झाल्यास मृत व्यक्तीच्या कुटुंबास किंवा वारसास एक रक्कमी रुपये २०,०००/- इतके अर्थसहाय्य देणेत येते.

**पात्रतेचे निकष, अटी व शर्ती :-** कुटुंबाचे नांव ग्रामीण / शहरी भागाच्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट असणे.

**आवश्यक कागदपत्रे :-**

१. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये नांव समाविष्ट असलेबाबतचा उतारा,

२. रहिवास दाखला,

३. मृत व्यक्तीचा ( स्त्रि / पुरुष ) मृत्यु दाखला.